यातील कोणत्या ग्लासमधील पाणी तू पिशिल? का?

_____

_____

_____

आम्ही विविध कारणासाठी विहीर, तलाव, नदी इत्यादीद्वारे मिळणारे पाणी वापरतो हे तुला माहीत आहे.

तुझ्या घरात पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी लागणारे पाणी मोठी माणसे कोठून आणतात?

_____

_____

जाणून घे.

'पाणी पिण्यासाठी योग्य नाही' याचा अर्थ पाणी शुध्द नाही, पाणी प्रदूषित झाले आहे. पाण्यामध्ये मातीचे कण, कचरा, डोळ्यांना दिसणारे अथवा न दिसणारे सुक्ष्मजंतू, भांडी कपडे धुतल्यानंतर येणारी घाण, शेतात वापरली जाणारी किटकनाशके, रासायनिक खते, कारखान्यातील दूषित पदार्थ मिसळल्याने पाणी दूषित होते. ते पाणी वापरण्यास योग्य रहात नाही. यालाच पाण्याचे प्रदूषण म्हणतात.

तुमच्या गावातील अथवा परिसरातील पाण्याचे स्त्रोत कोणते. ते जर प्रदूषित आहेत तर वडिलधाऱ्यांशी अथवा शिक्षकाशी चर्चा करून प्रदूषणाची कारणे जाणून घेऊन खालील तक्ता पूर्ण कर.

पाण्याचे स्त्रोत	प्रदूषित आहे / नाही	जर प्रदूषित आहे तर त्याचे कारण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED




गटारीच्या पाण्यात खेळू नका असे आजी का सांगत आहे?

_____

_____

_____



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रमेशला कॉलरा रोग कशामुळे झाला असेल? विचार करून लिही.

_____

_____

_____

दूषित पाण्यापासून होणारे इतर रोग कोणते ते तुझ्या शिक्षकांकडून आणि वडिलधाऱ्यांकडून जाणून घे आणि लिही.

_____

_____

_____

तुझ्या परिसरातील अथवा गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दे. तेथील डॉक्टराशी पाण्यामुळे पसरणाऱ्या रोगांबाबत चर्चा करून माहिती घे.



जाणून घे.

कॉलऱ्यासारखे रोग पाण्यापासून पसरतात. त्यावर वेळेवर उपाय नाही केला तर मृत्यू देखील होऊ शकतो. उलटी आणि जुलाबाने शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते आणि रोग्याला थकवा येतो. याला निर्जलीकरण म्हणतात. निर्जलीकरण रोखण्यासाठी उकळवून थंड केलेल्या पाण्यात मीठ, साखर, लिंबाचा रस मिसळून ते रोग्याला पाजवायचे यालाच पुर्नजलीकरण म्हणतात.

पाण्यापासून होणाऱ्या रोगावर कोणते प्रथमोपचार करावेत याबाबत डॉक्टर, वडीलधारी माणसे आणि शिक्षकाबरोबर चर्चा कर.

पुर्नजलीकरणासाठी आवश्यक ओ. आर. एस्.ची पाकीटे इस्पितळात किंवा औषध दुकानात मिळतात.

ओ. आर.एस् विषयी शिक्षकाकडून जाणून घे. ओ.आर. एस् चे सेवन केल्याने होणारे फायदे कोणते यांची यादी कर.

_____

_____

_____

डॉक्टर, वडीलधारे किंवा शिक्षक यांची मदत घेऊन मीठ, साखर, लिंबू रस वापरून ओ. आर. एस. करण्यास शिक.

ओ.आर.एस् चा वापर कसा करावा हे शिक.

दूषित पाणी पिऊन रोगाला बळी होऊन औषध घेऊन बरे होण्यापेक्षा शुद्ध पाणी पिऊन रोगांना प्रतिबंध करणे योग्य. त्या करिता शुद्ध पाणी दूषित होणार नाही याची काळजी घे.

दूषित पाणी शुद्ध कसे करावे हे वडीलधाऱ्यांकडून जाणून घेऊन येथे लिही.

_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या गावातील अथवा जवळच्या कोणत्याही कारखान्याला भेट दे. कारखान्यात वापरलेले पाणी ते काय करतात याचे निरीक्षण करून लिही.

तुझ्या गावातील पाण्याचे स्त्रोत प्रदूषित का झालेत त्याची कारणे तू समजून घेतला आहेस. पाण्याचे हे होणारे प्रदूषण थांबवण्यासाठी घेता येणारे प्रतिबंधक उपाय लिही.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या घरातील अथवा शाळेतील वापरले जाणारे पाणी प्रदूषित होणार नाही यासाठी तू कोणते प्रयत्न करशील याचा विचार करून लिही.

पाणी हे खूप अनमोल आहे. आम्हाला मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. ते वाया घालवू नका आणि ते प्रदूषित होऊ देऊ नका.

हे तुला माहीत आहे का ?

- आमच्या राज्यातील तसेच देशातील जास्तीत जास्त नद्या प्रदूषित आहेत.
- फ्लोरीन, पारा, अर्सेनिक आणि शिसे यासारखे विषारी रासायनिक पदार्थ मिसळलेले पाणी प्याल्याने अपायकारक रोग होतात.
- दूषित पाण्यामुळे जलचर विशेषता मासे मृत झाल्याच्या घटना आपल्या राज्यात घडल्याचा अहवाल आहे.
- 'प्रदूषण नियंत्रण मंडळ' ही एक सरकारी संस्था आहे जी पाण्याचा दर्जा सुरक्षित ठेवण्यासाठी स्थापन केली आहे.
- शहरात पिण्याचे पाणी पुरवठा करण्यापूर्वी त्यात 'क्लोरिन' नावाचा रासायनिक पदार्थ मिसळून ते जंतू मुक्त करतात.
- खतासाठीचे खड्डे, शौचालयाचे खड्डे हे विहीरी, तलाव इत्यादी पाण्याच्या स्त्रोतापासून कमीतकमी 10 m दूर असावेत, नाहीतर जंतूयुक्त पाणी खड्डयातून झिरपून पिण्याचे पाणी दूषित होते.
- पाणी उकळल्यानंतर त्यातील सुक्ष्मजंतू मरतात. उकळून थंड केलेले पाणी गाळून पिणे आरोग्याला हितकारक असते.
- समुद्रातील पाण्यात असलेल्या मिठाचा अंश कमी करून ते पाणी शेतीसाठी, घरगुती वापरासाठी योग्य करणे अत्यंत खर्चिक आहे. या पाण्यातील मिठाचा अंश कमी करण्याची क्रिया म्हणजे निर्लवणीकरण.
- शहरात पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी इमारतीवर पडणारे पावसाचे पाणी संग्रह करणे सक्तीचे केले आहे.
- पाण्याची कमतरता असल्याकारणाने कारखान्यात एकदा वापरलेले पाणी शुद्ध करून पुन्हा वापरले जाते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 8

आहार–आरोग्य

A4N8F2

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- समतोल आहाराचे वर्णन करशील.
- विविध पोषक घटकांचे वर्गीकरण करशील.
- आहार संरक्षणाच्या काही पद्धतींची सवय करशील.
- प्राणी आणि पक्षी यांच्या आहाराच्या सवयींची चर्चा करशील आणि त्यांच्या आहारानुसार त्यांचे दात अथवा चोच यांची रचना जाणून घेशील.

त्या दिवशी दिपाचा वाढदिवस होता. तिला गाजराचा हलवा खूप आवडतो. तिच्या आईने वाढदिवसासाठी गाजराचा हलवा केला होता. तिने तो आवडीने खाल्ला आणि ती झोपी गेली. तिला स्वप्न पडले. त्यात तिच्या स्वप्नात आले गाजर.



गाजर : दिपा, मी आहे गाजर. आज तू पुरेसा माझा हलवा खाल्लीस पण मला आता समजू दे की तू दररोज काय खातेस.

दिपा : मी दररोज वेगवेगळे आहार पदार्थ चांगल्या प्रकारे खाते. ते पदार्थ कसे आणि कशापासून बनवितात तेही माहित आहे.

गाजर : ठीक आहे. तू खात असलेल्या आहार पदार्थांची यादी कर.

कृती : तू देखील दिपासारखे तुला माहित असलेल्या आहार पदार्थांची यादी कर.

_____, _____, _____, _____,

_____, _____, _____, _____,

_____, _____, _____, _____ .

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गाजर : तू केलेल्या यादीतील आहार पदार्थांचे खालील गटामध्ये वर्गीकरण करून लिही.




शक्ती देणारे आहार पदार्थ

1. _____
2. _____
3. _____
4. _____
5. _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वाढ होण्यास मदत करणारे आहार पदार्थ

1. _____
2. _____
3. _____
4. _____
5. _____






गाजर : दिपा, तू खात असलेल्या आहार पदार्थात शक्ती देणारे, वाढ होण्याला मदत करणारे आणि शरीराचे आरोग्य टिकविणारे पोषक घटक तुला माहीत आहेत का?

दिपा : नाही नां!

गाजर : ते पोषक घटक म्हणजे 1) पिष्टमय पदार्थ 2) प्रथिने 3) स्निग्धपदार्थ 4) क्षारयुक्त खनिज पदार्थ 5) जीवनसत्वे.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED




आता हे पोषक घटक कोणकोणत्या आहार पदार्थात आहेत ते माझ्या मित्राकडून जाणून घे.



मी आहे नाचणा. माझ्यातील पोषक घटक आहे पिष्टमय पदार्थ. मी शरीराला शक्ती पुरवितो. ज्याच्यात जास्त पिष्टमय पदार्थ आहेत अशा माझ्या मित्रांची चित्रे दिली आहेत. ती ओळख आणि त्यांची नावे लिही.











_____, _____, _____, _____,










_____, _____, _____, _____.

पिष्टमय पदार्थांच्या कमतरतेमुळे अशक्तपणा निर्माण होतो.



दिपा, इथे पहा मी पावटा. माझ्यात खूप प्रथिने आहेत. मी तुमच्या शरीराच्या वाढीला मदत करतो.

NCERT NOT TO BE REPUBLISHED

माझ्या इतर मित्रांना पहा. त्यांना ओळख आणि त्यांची नावे लिही.









_____, _____, _____, _____, _____,

धान्याशिवाय इतर काही आहार पदार्थात प्रथिने आढळतात. चित्रांचे निरीक्षण करा आणि त्यांची नावे लिहा.







_____, _____, _____, _____,



गाजर : दिपा इथे पहा, हे आहे लोणी.यात मोठ्या प्रमाणात स्निग्धता असते. शेंगातेल, खोबऱ्याचे तेल, तीळाचे तेल, तूप यात देखील स्निग्धता असते.



दिपा : स्निग्धतेचा उपयोग काय?

गाजर : हे आपण थोड्या प्रमाणात खाल्लो तरी पुरेसे असते. स्निध पदार्थ आपल्याला पिष्टमय पदार्थापेक्षाही जास्त शक्ती देतात.

दिपा : होय का?

गाजर : तू भाजी, फळे, मीठ अथवा क्षार हे सारे खातेस का?

दिपा : होय मी खाते, परंतू मला हिरवी पालेभाजी आवडत नाही.



गाजर : हे पहा दिपा, सर्व प्रकारच्या भाज्या, हिरव्या पालेभाज्या, फळे तू खाल्ली पाहिजेत. कारण त्यात खनिज, क्षार आणि जीवनसत्व मोठ्या प्रमाणात असतात. ते तुझे रोगापासून संरक्षण करून तुला निरोगी बनविते.

गाजर : दिपा जीवनसत्व किती आहेत तुला माहीत आहे का?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिपा : होय,मुख्यता 4 जीवनसत्व आहेत असे मी ऐकले आहे.


गाजर : त्यांना आपण जीवनसत्व ए.बी.सी.डी म्हणतो. खालील तक्ता पहा.

जीवनसत्व	आहार पदार्थ	उपयोग
	हिरव्या आणि पिवळ्या भाज्या, फळें पालेभाज्या, गाजर, लोणी तूप, दूध आणि अंडी.	त्वचा आणि दाताचे आरोग्य चांगले राहते. डोळ्यांची दृष्टी चांगली राहते.
	गहू, नाचणा, उडीद, पालेभाज्या, कोंब आलेले अथवा अंकुरलेले धान्य.	त्वचा, हृदय आणि पचनसंस्थेचे आरोग्य चांगले राहते.
	संत्री, मोसंबी, लिंबू टोमॅटो,कच्चा भाज्या, आवळे, सफरचंद, अननस, अंकुरलेले धान्य.	दात आणि हिरडयांचे रक्षण होते.
	कॉडलीव्हर तेल, जेव्हा सूर्यकिरण त्वचेवर पडतात तेव्हा शरीरात डी जीवनसत्व तयार होते.	हाडे आणि दात बळकट होतात.

@KESS NOT TO BE REPUBLISHED

दिपा : जर हे आपण खाल्ले नाही तर काय होईल?

गाजर : खालील तक्ता बघ आणि सांग.

जीवनसत्व	अभावाने होणारे रोग
	रातांधळेपणा (कमी प्रकाशात वस्तू दिसत नाहीत.)
	बेरीबेरी (पायामध्ये पाणी भरणे, स्नायूमध्ये वेदना, श्वासोच्छवास आणि हृदयाच्या समस्या.)
	स्कर्व्ही (हिरड्या मऊ होऊन रक्त येते, पायांना सूज येते.)
	रिकेटस् (हाडांची विकृत वाढ होते. पाय वाकडे होतात.)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गाजर : तुला नेहमी आजारी पडायचे आहे का?

दिपा : नाही, निरोगी रहाण्यासाठी मी काय खाव?

गाजर : वर सांगितलेल्या आहारासोबत कडधान्य, मुळे, पालेभाज्या,सालीसह खाण्यायोग्य फळे आणि धान्य यांचे सेवन करावे. यात तंतूमय पदार्थ असल्याने मलविसर्जनाला त्यांची मदत होते.

दिपा : हे सर्व पदार्थ एकाच वेळी खाणे शक्य आहे का?


गाजर : तसे काही नाही. हे सर्व आहार पदार्थ दररोज एका विशिष्ट प्रमाणात सेवन केले पाहिजेत.

त्यामुळे शरीराला आवश्यक प्रमाणात पोषक घटक मिळतात. जो आहार शरीराला आवश्यक प्रमाणात पोषक घटक मिळतात. जो आहार शरीराला आवश्यक, तितक्या प्रमाणात योग्य पोषक घटक मिळवून देतो त्याला **समतोल आहार** म्हणतात. त्याशिवाय तू या आहारासोबत 4 ते 5 ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे.

दिपा : समतोल आहार कसा असावा?

गाजर : हा तक्ता पहा आणि समजून घे.

समतोल आहाराचा तक्ता



पाणी	100 पैकी	75 भाग
पिष्टमय पदार्थ	100 पैकी	14 भाग
प्रथिने	100 पैकी	5 भाग
स्निग्ध पदार्थ	100 पैकी	4 भाग
जीवनसत्व आणि क्षार	100 पैकी	2 भाग

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा.

पिष्टमय पदार्थात येती धान्य आणि ऊस,
तेल आणि तुप आहेत स्निग्धाचे अंश.
प्रथिनांचे अंश आहेत कडधान्ये आणि दूध,
भाजीपाला फळे देती जीवनसत्वे खूप.

सर्वामध्ये आहेत खनिजे आणि क्षार,
धष्टपुष्ट होण्यासाठी यांची गरज फार.
आवडते म्हणून एकच खाऊ नका जास्त,
समतोल आहार घेऊन रहा तुम्ही मस्त.

खेळ खेळा

तुझ्या मित्रासोबत हा खेळ खेळ. खडूचे रिकामे खोके घ्या. त्यावर रंगीत कागद चिकटवा आणि त्यावर पोषक घटकांची नावे लिहा.

एक ड्रॉईंग कागद घ्या. त्याचे लहान लहान वर्तुळ कापा. त्यावर आहार पदार्थांची नावे लिहा किंवा त्यांची चित्रे चिकटवा.

शिक्षकांच्या मदतीने ते वर्तुळाकृती कागद, त्यावर नाव लिहिलेला पदार्थ ज्या पोषक घटकात येतो त्या खोक्यात ठेवा.

त्यानंतर तुमच्या वर्ग मित्र / मैत्रिणींना क्रमाने येऊन त्या खोक्यातील कागद घेऊन त्यावरील पदार्थांचे नाव वाचून तो कागद खोक्यात ठेवा.

त्यानंतर तुमच्या वर्ग मित्र / मैत्रिणींना येऊन कागद घेण्यास सांगा आणि त्यावरील पदार्थांचे नाव वाचून पोषक घटकाच्या खोक्यात ठेवण्यास सांगा.

सर्वात शेवटी कोणत्या खोक्यात जास्त वर्तुळाकार कागद आहेत ते मोजा.

दिपा : प्राणी आणि पक्ष्यांना देखील आमच्या सारखीच अन्नाची गरज असते ना?

गाजर : होय, त्यांना देखील आमच्या सारखेच अन्न लागते.

खालील तक्त्यात दिलेल्या प्राण्यांच्या आहाराची नावे लिहा.

अ.क्र.	प्राण्याचे नाव	सेवन करत असलेला आहार
1.	वाघ	
2.	बगळा	
3.	हरीण	
4.	हत्ती	
5.	घार	
6.	फुलपाखरु	
7.	डास	
8.	गाय	
9.	कुत्रा	
10.	उंदीर	


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिपा : प्राणी आहार कसा सेवन करतात.


गाजर : पक्षी, प्राणी आहार सेवनासाठी दात, चोच किंवा सोंडेचा वापर कसा करतात ते बघ आणि समजून घे.

खालील चित्रे बघ आणि रिकाम्या जागा भर.











© NCERT NOT TO BE REPUBLISHED

- वाघ आपल्या _____ च्या सहाय्याने मांसाचे तुकडे काढत आहे.
- घारीला आपला आहार धरण्यासाठी _____ पाय आहेत.
- फुलपाखराला फुलातून _____ शोषून घेण्यासाठी सोंड असते.
- बगळ्याला त्याचा आहार असलेले _____ पकडण्यासाठी लांब चोच असते.
- हत्ती _____ सहाय्याने गवत धरून खातो.

तुला माहीत असलेले वेगवेगळे प्राणी, पक्षी हे त्यांच्या आहार सेवनासाठी पाय, दात, चोच यांचा वापर कसा करतात ते लिही.

प्राण्याचे नाव	आहार	मदत करणारा अवयव	कशी मदत होते.
1.			
2.			
3.			
4.			
5.			

दिपा : बापरे! प्राण्यांच्या आहार सेवनाचा क्रम अद्‌भुत आहे. गाजरा, गाजरा मला भूक लागली आहे. आणखी जरा हलवा खाऊन परत येते.

दिपा स्वयंपाक घरात गेली. पहाते तर काय झुरळ हलवा खात होते. ते पाहुन दिपा किंचाळली.



गाजर : दिपा काय झाले?

दिपा : झुरळ हलवा खात आहेत. त्यांना पळव. मला हलवा खायचा आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गाजर : नको दिपा, तो हलवा खाऊ नको. एकदा जर आहाराला, अशा प्राण्यानी स्पर्श केला तर तो आहार दूषित होतो. तो खाऊ नये.

दिपा : खाल्ल तर काय होतय?

गाजर : वर्तमानपत्रातील ही बातमी वाच.

दूषित आहार सेवन करुन मुले अस्वस्थ

जत्रेतील उघड्यावर ठेवलेले पदार्थ खाऊन मुले आजारी पडली. आहारातील दूषितपणा हेच याचे कारण म्हटले जाते. माश्या आणि झुरळ बसलेला आहार खाल्याने उलटी जुलाबाचा त्रास सुरु झाल्याने त्यांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे. जास्त अस्वस्थ असलेल्या 4 मुलांना उपचारासाठी शहरातील इस्पितळात दाखल केले आहे.

दिपा : गरीब बिचारे !

गाजर : चल, तुला जवळच असलेल्या जत्रेत घेऊन जातो. तिथे पहा त्या दुकानात खाण्याचे पदार्थ उघड्यावर ठेवले आहेत.

दिपा : त्या माश्या आधी कचऱ्यावर बसतात आणि उडत येऊन त्या मिठाईवर देखील बसतात.



गाजर : असले पदार्थ खाल्याने कॉलरासारखे रोग होतात. कीटक पदार्थावर बसू नयेत या करिता आहार पदार्थ नेहमी झाकून ठेवावेत. पिण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या भांड्यावर नेहमी झाकण ठेवावे. पाणी दूषित होणार नाही याची काळजी घ्यावी. आहार सेवन करण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत, समजल?

दिपा : होय, समजल मला.

NOT TO BE REPUBLISHED @KYBS

गाजर : नासलेले अन्न खाऊ नये. भाजीपाला, फळे खाण्यापूर्वी स्वच्छ धुवून घ्यावीत. कापलेली फळे लगेच खावीत. भाज्या जास्त शिजवू नयेत कारण त्यातील पोषक घटकांचा नाश होतो. आहार पदार्थ शिजविल्याने मऊ होतात आणि त्यांचे पचन सहज होते. पदार्थ शिजविल्याने त्यातील सुक्ष्मजंतूंचा नाश होतो. गरम आहार घ्यावा. तेलकट, तळलेले जास्त मसालेदार पदार्थ खाऊ नको.

दिपा : मी यांचे पालन करते, तुला माहीत आहे का?

गाजर : तर मग झुरळानी खाल्लेला हलवा लगेच बाहेर टाक.

दिपा : ठीक आहे.

दिपाने हुंदके देत तो हलवा बाहेर टाकला. स्वप्नात हुंदके देत असलेले पाहून दिपाला आईने उठविले. दिपा एकदम जागी झाली आणि तिने आईला विचारले, 'आई तू हलवा झाकून का ठेवला नाहीस?' आईने तिला हसत विचारल 'तुला स्वप्न पडल होत का?

तुमच्या घरात तयार केलेला आहार तुम्ही कसा सुरक्षित ठेवता? विवरण कर.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

रिकाम्या जागा भर.

1. आहारातील पोषक घटक _____, _____, _____, _____ व _____ .
2. कडधान्यातील पोषक घटक _____ होय .
3. आम्ही दररोज _____ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे.
4. _____ जीवनसत्वाच्या अभावाने रातांधळेपणा येतो.
5. संत्र्यामध्ये _____ जीवनसत्व जास्त प्रमाणात असते .

खालील विधानांची कारणे लिही.

1. अशुद्ध आहाराचे सेवन करु नये.

   _____

2. समतोल आहाराचे सेवन करावे.

_____

3. शिजवलेले आहार पदार्थ व्यवस्थित झाकून ठेवावेत.

_____

4. रस्त्याच्या कडेला उघड्यावर विकले जाणारे खाद्य पदार्थ आणि कापून ठेवलेली फळे खाऊ नयेत.

_____

जीवनसत्व आणि त्यांचे उपयोग यांच्या जोड्या जुळव.

जीवनसत्व	ए	हाडांचे आणि दातांचे रक्षण करते.
जीवनसत्व	बी	दृष्टी आणि त्वचेचे रक्षण करते.
जीवनसत्व	सी	हृदय आणि पचनसंस्थेचे रक्षण करते.
जीवनसत्व	डी	दात आणि हिरड्यांचे रक्षण करते.

@MSBSHSE NOT TO BE REPUBLISHED

हे तुला माहीत आहे का ?

- सूर्याचे किरण आपल्या शरीरात जीवनसत्व ड तयार करण्यास मदत करतात.
- आयोडीनच्या कमतरतेने गॉयटर हा रोग होतो.
- आम्ही तांदूळ, गहू, जोंधळा आणि नाचणा ही मुख्य धान्य वापरतो.
- आहार पदार्थात जेव्हां सुक्ष्मजंतूचा प्रवेश होतो तेव्हा ते पदार्थ बिघडतात किंवा नासतात. सुक्ष्मजंतुमूळे पदार्थावर बुरशी येते. असे पदार्थ खाल्याने जठर आणि आतड्यांना संबधीत रोग होतात. काही वेळा रोगाचे स्वरूप गंभीर होऊन मृत्यू होऊ शकतो.
- वाळवणे, मीठात ठेवणे, धूर देऊन ठेवणे, शितकरण, उकळविणे इत्यादी क्रियेद्वारे घरातील आहार पदार्थ टिकवून ठेवतो. बाजारात विकले जाणारे काही खाद्यपदार्थावर संस्करण करून निर्जंतूक केले जातात त्यानंतर त्यांची विक्री होते. उदाहरणार्थ : शितपेय, ब्रेड, फळांचा रस, जाम इत्यादी.


पाठ 9

आहाराच्या सवयी

R3U9X9

या पाठाच्या अध्यायनंतर तू.

- आपणाला आहार कोठून व कसा उपलब्ध होतो याचे विवरण करशील.
- सामुहीक भोजनाचे प्रसंग ओळखतील. त्यात अवलंबिलेला क्रम ओळखशील.
- आहार आणि संस्कृतीतील विविधता जाणून घेशील.
- आपल्या जिल्ह्यातील आणि शेजारच्या जिल्ह्यातील आहार आणि सांस्कृतिक विविधता जाणून घेशील.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आहाराबाबत मी दिपाबरोबर चर्चा केली ती तू समजून घेतला असशील. आम्हाला आहार पदार्थ कोठून आणि कसे मिळतात याचा कधी विचार तू केला आहेस का ?

पुढील पानावर दिलेली चित्रे पहा. आहार पदार्थांच्या निर्मितीच्या पायऱ्या दिल्या आहेत. त्यांचा योग्य क्रम ओळख. कोणत्या चित्रानंतर कोणते चित्र यावे याची क्रम संख्या लिही. दिलेल्या रिकाम्या जागेत त्या बाबत एक वाक्य लिही.







@KTBS
NOT TO BE REPUBLISHED








@KTBS
NOT TO BE REPUBLISHED









@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या घरात वापरल्या जाणाऱ्या 10 आहार पदार्थांच्या नावांची यादी कर. ते पदार्थ कोठून उपलब्ध झाले ते लिही.

क्र.स.	अन्न पदार्थ	उपलब्ध होण्याचे ठिकाण.
1.		
2.		
3.		
4.		
5.		
6.		
7.		
8.		
9.		
10.		

तुझ्या घरात दररोज तयार केले जाणारे स्वयंपाकातील पदार्थ आणि एखाद्या सणाच्या दिवशी केले जाणारे पदार्थ इथे लिही.

दररोज केले जाणारे पदार्थ	सणादिवशी केले जाणारे पदार्थ

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या घरात प्रत्येक सणाला एकाच प्रकारचा स्वयंपाक केला जातो का? जर नाही तर, वेगवेगळया सणादिवशी तयार केल्या जाणाऱ्या पदार्थांची नावे लिही.

सणांची नावे	तयार केले जाणारे पदार्थ
1.	
2.	
3.	
4.	
5.	

तुझी यादी तुझ्या मित्राच्या/मैत्रिणीच्या यादीशी तुलना करुन बघ.



तुझ्या घरात आणि तुझ्या मित्र/मैत्रिणीच्या घरात तयार केलेल्या विशेष पदार्थांची तुलना कर. यातून तुला काय समजले ते इथे लिही.


_____

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या गावातील उत्सव, जत्रा, उरुस या सारख्या कार्यक्रमात तू कधी जेवण केला आहेस का? चल आमच्या गावच्या जत्रेत जाऊया. ते पहा लोक मिरवणूकीतून कसे पुढे पुढे जात आहेत. ढोल नगाऱ्यांचा आवाज वाढत आहे. वाघाचा मुखवटा घातलेल्यांचे नृत्य, लाकडी घोडयांचे नृत्य तिथे जमलेल्या लोकांचे मनोरंजन होत आहे. जत्रेसाठी जमलेल्या लोकांसाठी गावकऱ्यानी सामुहीक जेवणाची तयारी केली आहे. त्यासाठी लोकांनी सहकार्य केले आहे.





गावातील लोकांनी आपल्याला शक्य तितके धन, धान्य, किराणा सामान तसेच इंधन इत्यादी त्यासाठी देणगी म्हणून दिले आहे. काही लोकांनी एकत्र येऊन स्वयंपाक केला आहे. तेथे वेगवेगळे गोड पदार्थ तयार केले आहेत. चल आम्ही देखील जेवण करुया. काहीजण जेवण झाल्यानंतर जेवणाची पान स्वतःहून काढून जागा स्वच्छ करत आहेत. चल आम्हीपण त्यांच्यात सहभागी होऊया. जत्रेला आलेले लोक आनंदाने परत जात आहेत. त्यांना एकत्र काम केल्याचे तसेच जेवण केल्याचे समाधान वाटते.





तू देखील या सारख्या सामुहीक भोजनामध्ये भाग घेऊन जेवण केला असशिल. तो प्रसंग कोणता? तू सहभागी झालेल्या सामुहीक भोजनाबद्दल विवरण कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

_____

_____

_____

तू सहभागी झालेल्या यात्रेचे वर्णन कर.

_____

_____

_____

_____

_____

_____

सामुहीक भोजनाच्या प्रसंगात घ्यावयाच्या खबरदारीची यादी येथे आहे.



जाणून घे.

- स्वयंपाकासाठी वापरली जाणारी सामुग्री, भांडी, आणि पाणी शुद्ध आणि स्वच्छ असावे.
- स्वयंपाक करणारे आणि जेवण वाढणारे लोक स्वच्छ असावेत. त्यांची नखे काढलेली असावीत, तसेच त्यांनी केस कपड्यांनी बांधले अथवा झाकलेले असावेत.
- जेवणाला बसण्याची जागा ही धूळ आणि कृमीकिटकापासून मुक्त असावी.
- पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा.
- स्वयंपाकाची जागा स्वच्छ असावी. तयार केलेल्या आहारात कीटक आदी पडणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- स्वयंपाक करावयाच्या ठिकाणी हवा खेळती असावी आणि भरपूर प्रकाश असावा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या शाळेतील **मध्यान्ह आहार** हे एक सामुहीक भोजन होय. सामुहीक भोजन करताना कोणती खबरदारी घ्यावी ते इथे लिही.

_____

_____

_____

_____

_____

तुला माहीत आहे का? वेगवेगळया प्रदेशातील लोक वेगवेगळ्या आहार पद्धतीचा वापर करतात.

उदाहरणार्थ : बेळगाव, बिदर यासारख्या उत्तरेकडील जिल्ह्यात जोंधळ्यापासून केलेल्या पदार्थांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे मंगळूर, उडपी यासारख्या किनारपट्टीच्या जिल्ह्यात माशाचे जेवण खास असते. मंडया, मैसूर सारख्या मैदानी प्रदेशात नाचणा आणि तांदूळ यांचा जास्त वापर केला जातो.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

त्या त्या प्रदेशात मिळणाऱ्या आहार पदार्थानुसार लोकांच्या आहाराच्या सवयी अवलंबून असतात. आपला प्रदेश/आपले कुटुंब यातील संस्कृतीला पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीला अनुसरुन आहार पद्धती आहेत.

तुझ्या जिल्ह्यात केले जाणारे स्वयंपाकातील विशेष पदार्थ लिही.

_____

_____


_____

तू इतर जिल्ह्यातील आहारपदार्थांचे निरीक्षण केला आहेस का?

तू कधी त्या पदार्थांची चव घेतली आहेस का ? तू तुझे अनुभव येथे लिही.

हे तुला माहीत आहे का ?

- एखादा मोठा अजगर कोणताही आहार न घेता एक वर्षपर्यंत जगू शकतो.
- तू सेवन करत असलेल्या आहाराचा जास्तीजास्त भाग तुझे शरीर उबदार ठेवण्यासाठी मदत करतो.
- जेवणाआधी फळे खाणे उत्तम. त्यामुळे फळातील पोषक घटकांचे चांगले पचन होऊन ते घटक रक्तात मिसळतात.
- भाज्या कच्च्या अथवा साधारण अर्धवट शिजविलेल्या खाव्यात. जर भाज्या जास्त प्रमाणात शिजविल्या तर त्यातील पोषक घटक नष्ट होतात.
- ख्रि.पू. 278 पूर्वी इजिप्तमध्ये मुळ्याचे पीक घेत असत. आश्चर्य म्हणजे त्यावेळी मुळ्याचा रंग काळा होता.
- आम्ही आहार योग्य प्रमाणात खावा. प्रमाणाबाहेर खाण्याने आरोग्य बिघडते.
- तांदळाच्या वरील बाजूला बी जीवनसत्व जास्त प्रमाणात असते जर तो तांदूळ जास्त पॉलीश केला तर ब जीवनसत्व नष्ट होते.
- एका सफरचंदामध्ये जितके पोषक घटक असतात तितकेच पोषक घटक 2 केळी किंवा 5 रानआवळयामध्ये असतात.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 10

निवारा

या पाठाच्या अध्यायनंतर तू.


- काळानुसार घरांच्या निर्मितीत होणारे बदल ओळखतील.
- खेडेगाव व शहरातील घरामध्ये असणारे फरक ओळखतील.
- शहरातील बहुमजली इमारती आणि झोपडपट्ट्याबद्दल जाणून घेतील.
- प्राण्यांचे निवासस्थान व त्यातील विविधता यांचा तक्ता तयार करतील.
- पक्ष्यांच्या घरट्यांची रचना, त्यासाठी वापरलेल्या वस्तूंतील विविधता ओळखतील.

घराची गरज, ते बांधताना लागणारी सामुग्री आणि बांधकामातील विविधता याबाबतचे काही विचार तुला समजले आहेत. आता आपण आपल्या राज्यातील विविध भागात बांधलेल्या घरांबद्दल जाणून घेऊ.

शिक्षण खात्याने धारवाडमध्ये एका शिबीराचे आयोजन केले आहे. या ठिकाणी राज्यातील विविध भागातून मुलेमुली आल्या आहेत. ते आपल्या प्रदेशातील घराबाबत चर्चा करी आहेत. चला आपण देखील तेथे जाऊ. सर्वमुले तिथे बसली आहेत. एका नंतर एक आपले विचार मांडत आहेत. तिथे बसून आपणही ऐकूया.



मी संगिता, कलबुरगी जिल्ह्यातील जेवरगी तालुक्यातून आली आहे. तिथे उन्हाळा जास्त आणि पाऊस कमी. तेथील घरे शहाबादी दगडांनी बांधतात. त्यावर छप्पर बांधताना लाकडी तुळया बसवून वर फळया घालतात. छप्परावर माती कालवून चिखल घालतात. त्यानंतर त्याच्यावर काहीजण शहाबादी फरश्या घालतात.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जेवरगी भागातील लोक दगडांची घरे बांधतात. याचे कारण काय याबाबत तुझ्या मित्र/मैत्रिणी अथवा शिक्षकांशी चर्चा करुन लिही.

_____

_____

_____

_____

तेथील घरांचे छप्पर घालतांना त्यावर चिखल घालतात. याचे कारण काय याबाबत तुझ्या मित्र/मैत्रिणी अथवा शिक्षकांशी चर्चा करुन लिही.

_____

_____


_____


_____


@KTBS NOT TO BE REPUBLISHED




मी जॉन, मी चिक्कमंगळूर जिल्ह्यातील कोप्प येथून आलो आहे. आमच्या भागात पाऊस खूप पडतो. येथील लोक विटा किंवा चिखलाचा वापर करुन घराच्या भिंती बांधतात. त्यावर वाळलेले गवत वापरुन छप्पर बनवितात. छप्पराला उतार असतो. दरवर्षी छप्पराचे गवत बदलतात. 4 किंवा 5 वर्षातून एकदा पूर्ण गवत बदलतात. काही लोक जंबुरी चिऱ्यांच्या विटांचा वापर करुन घराच्या भिंती बांधतात व वर छप्परासाठी उतरत्या स्वरुपात कौले बसवितात. चिक्कमंगळूर सारख्या जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशात घरांची छप्परे उतरत्या स्वरुपात असतात. असे का?









विचार करुन लिही.

_____

_____

_____

_____

छप्परासाठी वाळलेल्या गवताचा वापर केल्याने काय फायदा होतो ? मित्र/मैत्रिणीशी चर्चा करुन लिही.


_____


_____

_____



मी हसिना, बेंगळूरुहून आले आहे. इथे अलीकडे घरावर घरे बांधत आहेत. त्याना बहुमजली इमारती म्हणतात. भाजलेल्या विटा किंवा सिमेंटपासून बनविलेल्या विटा आणि लोखंडाच्या सळ्या व सिमेंट यांचा वापर करुन इमारती बांधतात. जमिनीवर बहुरंगी फरश्या बसवितात. इमारतीत वर जाण्यासाठी जीने व त्यासोबत लिफ्टची सोय असते. बहुमजली इमारती बांधण्यासाठी क्रेन, काँक्रीट मिक्सरसारख्या मोठया यंत्रांची आवश्यकता असते.





बहुमजली इमारतीचे फायदे कोणते? विचार करुन लिही.

_____

_____

_____

_____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

बहुमजली इमारतीचे तोटे कोणते ? गटामध्ये चर्चा करुन तुझे मत लिही.

_____

_____

_____



मी विवेक, मी देखील बेंगळूरुचा. माझे घर झोपडपट्टीत (गलीच्छ वस्ती जवळ) आहे. येथील घरे खूप लहान असतात. ही घरे विटा, वाळलेली पाने, लोखंडी पत्रे, नारळाच्या झावळ्या यांच्या सहाय्याने बांधलेली असतात.



घरांचे छप्पर नारळाच्या झावळ्या, वाळलेली पान किंवा लोखंडी पत्र्यांचे असते. काही लोक कौलांचा देखील वापर करतात. या प्रदेशात गटारी नसल्या कारणाने भांडी घासलेले, कपडे धुतलेले किंवा अंघोळ केलेले पाणी घराजवळच साचून रहाते. त्यामुळे डासांचा जास्त त्रास होतो. एखाद्या छोट्याशा भागात एकमेकाला लागून लागून घरे असल्याकारणाने त्यात पुरेसा प्रकाश अथवा हवा मिळत नाही. इथे राहणारे लोक आपल्या भोवतालचा प्रदेश स्वच्छ ठेवत नाहीत. घरातील केरकचरा टाकावू वस्तू कोठेही टाकतात. त्यामुळे कचऱ्याचे ढीग तयार होतात. त्यावर बसलेल्या माशा, कीटक यांच्यामुळे रोग पसरतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तू कधी झोपडपट्टी पाहिला आहेस का? झोपडपट्टीच्या प्रदेशात कोणत्या प्रकारचे बदल करता येतील? विचार करुन चार बदल लिही.

_____


_____

_____

_____

एखाद्या प्रदेशाचे हवामान, त्या भागात उपलब्ध साहित्यानुसार तेथील घरे बांधतात हे तुला आता समजले ना?


आता आपण इंदूआजीने सांगितलेली गोष्ट ऐकूया. पूर्वी इंदूआजी आपल्या खेडेगावी रहात होती. आता ती बेंगळूर येथील नातवाच्या बहुमजली इमारतीत राहते. ती येथील वैभव पाहून आश्चर्यचकित झाली. ती सोफ्यावर बसली आणि बालपणीच्या आठवणीत गुंग झाली.






मी तेव्हा लहान होते. मी, माझ्या तीन बहिणी, दोन भाऊ आणि आईवडील एका झोपडीत रहात होतो.

जेव्हा पाऊस पडायचा तेव्हा, पावसाचे पाणी झोपडीत गळायचे. उन्हाळ्यात छप्परावरील गवत वाळल्याने त्याला छिद्रे पडायची. एक दिवशी आमच्या झोपडीला आग लागून ती पूर्णपणे जळली. झोपडी जळाल्यानंतर माझ्या आईवडिलांनी घर बांधण्याचे ठरविले. माझ्या वडिलांनी आणखी काही लोकांची मदत घेऊन मातीच्या भिंती उभ्या केल्या.




नजिकच्या जंगलातून वडिलानी बांबू आणले. मी, माझी आई, बहिणी व भाऊ साऱ्यांनी देखिल बांबू आणले आणि ते भिंतीवर घालून त्यावर मातीचा चिखल करुन घातला. त्यानंतर माझ्या आईने आजुबाजुच्या भागातील शेण जमा केले. त्याचा काला केला व त्याने भिंती, जमीन सारवल्या. घरासमोरील जागा सारवून त्यावर रांगोळी घालून एक दिवशी आम्ही घरात प्रवेश केला.




हळू हळू मी मोठी होत गेले, पुढे माझे लग्न झाले. मी नवऱ्याच्या घरी आले. तेथील घर आमच्या पूर्वीच्या घरापेक्षा चांगले होते. त्या घराच्या भिंती पक्क्या विटांनी बांधून भिंतीना रंग दिलेला होता. छप्परावर मंगळूरी कौले होती.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



जमिनीला काळी फरशी घातली होती. सुंदर कोरीव काम केलेले दरवाजे होते. भरपूर प्रकाश व हवा येण्यास मोठ्या खिडक्या होत्या. आमच्या शेजारी सुद्धा असेच एक घर बांधलेले होते. परंतू त्यांनी छप्परावर दगडी फरश्या घातलेल्या होत्या. जमिनीवर सिमेंटने गुळगुळीत पृष्ठभाग केला होता.



शेण किंवा चिखलाने जमीन सारविण्याचे काम मला नव्हते. मी जमीन पाण्याने पुसुन काढले की पुरे. तेवढयात तिच्या नातवाने कॉफी आणल्याने ती आपल्या तंद्रीतून बाहेर आली. तिला तिच्या मुलीच्या घराची आठवण झाली. तिच्या मुलीचे घर पूर्णपणे रंगविलेले होते. घरासभोवती कंपाउंड होते आणि लहानशी बाग सुद्धा होती. अशा सर्व सोयी असणारे तिचे घर फारच सुंदर होते.

इंदूआजी आपल्या नातवाच्या संकुलाकडे पाहू लागली. 500 पेक्षा जास्त कुंटुंबे असणारी ती 15-20 मजली इमारत होती. वरच्या मजल्यावर जाण्या येण्यासाठी लिफ्ट सेवा होती. इमारत बांधतांना काही यंत्रांचा उपयोग केला गेला होता. प्रत्येक घरामध्ये तीन खोल्या होत्या. बैठकीची खोली, स्वंयपाक खोली व झोपण्याची खोली अशा त्या खोल्या होत्या. काड्यापेटीसारखी अशी अनेक घरे जवळ-जवळ अंतरावर बांधलेली होती. येथे प्रकाश व वायुविजनाची थोडी अडचण होती. घरातील साहित्य ठेवण्यास नविन पद्धतीची कपाटे होती. दरवाजे आणि खिडक्या लाकडी नव्हत्या त्या लोखंडाने किंवा प्लास्टिकने बनविलेल्या होत्या.

झोपडी ते बहुमजली इमारतींच्या बांधकामात झालेला बदल पाहून इंदूआजी आश्चर्यचकित झाली होती.

या गोष्टीतून तू काय शिकलास ? ते लिही.

_____

_____

_____

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इंदूआजीच्या गोष्टीत दिसून आलेल्या पाच प्रकारच्या घरांची नावे लिही.

_____, _____, _____, _____, _____.


तुझ्या परिसरातील घरे बांधण्यात काय बदल झाले आहेत? वडीलधाऱ्यांना विचारुन लिही.


_____

_____

_____


घरे बांधण्याच्या साहित्यात बदल होत आहेत. झोपडी ते बहुमजली इमारती बांधण्यास लागणाऱ्या साहित्यांची यादी कर.






_____ _____

_____ _____





_____ _____

_____ _____

किंमती माहिती करुन घे आणि लिही.


1. एक पोते सिमेंट
2. एक विट
3. एक ट्रक वाळू
4. एक टन लोखंड

आता	गेल्या वर्षी
_____	_____
_____	_____
_____	_____
_____	_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

घर बांधणीसाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या लाकडांचे प्रकार तू माहीत करुन घे.

घर बांधण्यास लागण्याऱ्या साहित्यांची चित्रे येथे दिलेली आहेत. तुझे घर बांधण्यास वापरलेल्या साहित्याच्या चित्राला (✓) अशी खुण कर.



घरे बांधण्यामध्ये हल्ली भरपूर बदल होत आहेत. प्राण्यांच्या आणि पक्षांच्या निवासस्थानामध्ये कोणते बदल झाले आहेत का ? निरीक्षण कर.

काही प्राणी आणि पक्षी यांच्या निवासस्थानांचे तू निरीक्षण केले आहेस का? प्राणी आणि पक्षी यांची निवासस्थाने पाहून खालील तक्ता पूर्ण कर.

प्राणी/पक्ष्याचे नाव	निवासस्थान	बांधण्यास वापरलेले साहित्य
1. चिमणी		
2. वाळवी		
3. विणकर पक्षी		
4. पोपट		
5. वाघ		
6. मासा		
7. सुतार पक्षी		
8. कावळा		
9. बेडूक		
10. उंदीर		
11. मधमाशी		
12. साप		

@KTBS NOT TO BE REPUBLISHED








प्राण्यांच्या निवासस्थानामध्ये सुद्धा विविधता असते. आपले निवासस्थान तयार करण्यास ते वेगवेगळे साहित्य वापरतात, हो की नाही ?

हे करुन पहा :

कागद, पुठ्ठा, गवत, वाळलेली पाने इत्यादि वापरुन प्राण्यांची निवासस्थाने तयार करण्याचा प्रयत्न कर. काडीपेटी, पुठ्ठा, चिखल, विटा, गवत यासारख्या सहज उपलब्ध होण्याऱ्या साहित्यापासून एक घर बांध.

हे तुला माहीत आहे का ?

- **बुर्ज खलिफा** ही जगातील सर्वात उंच इमारत आहे. तिची उंची 829.2 m (2722 फूट) आहे.
- भारतातील सर्वात मोठी झोपडपट्टी मुंबईत धारावी येथे आहे. तेथे 10 लाख पेक्षा जास्त लोक राहतात. ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे असे सुद्धा म्हटले जाते.
- आता काही ठराविक साहित्य वापरुन पर्यावरण स्नेही घरे बांधण्यात येत आहेत. सूर्याच्या उष्णतेने गरम पाणी मिळविणे, पावसाच्या पाण्याचे संकलन करणे व घरच्या घरी कचऱ्याची विल्हेवाट लावणे या सारखी घरे बांधण्यात लोकांच्यात आवड निर्माण होत आहे.
- भारतात 650 एकर पेक्षा जास्त जमिनीवर मुंग्यांची वारुळे आहेत अशी नोंद आहे. त्यांना मोठी घरटी किंवा घरे म्हणतात. तेथे लाखो मुंग्या राहतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

◆ ◆ ◆ ◆

पाठ 11

कचरा – एक संपत्ती


Z6I3F6

या पाठाच्या अध्यायनंतर तू,

- ग्रामीण भागातील व शहरी भागातील कचरा यातील फरक जाणशील.
- कचऱ्याची विल्हेवाट कशी करावी हे समजून घेशील.
- कचरा नियंत्रीत करण्याच्या सवयी लागशील.

एका सुंदर सकाळी एक पैंगीळ उडत येऊन कचराकुंडावर बसला. कचराकुंडाने आपल्या समस्या त्याला सांगायला सुरुवात केली.







@KTRS NOT TO BE REPUBLISHED



वास !
घाण वास !



पैंगुळया ! हे बघ
भाजीपाल्याच्या साली,
फळांच्या साली, चहाची पावडर,
खाद्यपदार्थांचे तुकडे हे सारे
कुजतात त्यामुळे
दुर्गंध येतो.



हे झुरळांनो,
तुम्ही इथे काय
करता ?

अरे आम्ही येथे
आरामात आहोत. पहा
आमची पिल्ले कशी आनंदाने
इकडे तिकडे फिरत आहेत.



अरे भाऊ, फक्त झुरळच
नव्हे. तर उंदीर सुद्धा
येथे रहातात.



© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

अरे भाऊ, या
कचऱ्यात डबे, प्लास्टीक
रबर सुद्धा असते. ते कुजत
नाहीत, खर तर अशा वस्तू त्यांनी
जुन्या वस्तू विकत घेणाऱ्यांना
द्याव्यात.




जुने प्लास्टीक –
डबा – बाटली..

टाकलेल्या वस्तू पहा, त्यात असलेल्या विविध रंगाच्या बाटल्या, डबे, कागद एकत्र करुन त्यापासून उपयुक्त वस्तू बनवता येतील.



तिथे पहा लहान मुलांनी टाकाऊ वस्तूपासून टिकावू वस्तू बनविल्या आहेत.

तिथे पहा, तुला घेऊन जाण्यासाठी ट्रक येत आहे.



आहा ! आता मी स्वच्छ आहे. कचरा एकत्र करुन त्याची विल्हेवाट केली पाहिजे.






मला गावाबाहेर घेऊन जात आहेत. तिथे मी कुजून माझे खत होते.

NOT TO BE REPUBLISHED

ते नगरपालिकेचे कामगार आहेत. ते कचराकुंडीतील कचरा घेऊन जाण्यासाठी वाहन घेऊन आले आहेत. ते कचराकुंडीतील कचरा काढून ती जागा स्वच्छ व निटनेटकी ठेवतात. तो कचरा गावाबाहेर नेऊन त्याची विल्हेवाट लावतात. कोणता कचरा कोठे टाकावा याचे सूचना फलक भिंतीवर लावले आहेत.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED


कोरडा कचरा



प्लास्टीक, काच, धातूचे तुकडे, फाटके कपडे, रबर इत्यादी.


हे सर्व टाकावू वस्तू गोळा करणाऱ्यांना द्या.

ओला कचरा





शिल्लक राहिलेले अन्न, स्वयंपाक घरातील कचरा, नासलेले आहार पदार्थ, मांस, भाजीपाल्याचा कचरा, वाळलेली पाने, कागदाचे तुकडे इत्यादी.

यांचे खतात रुपांतर करा.

अपायकारक कचरा		रंग, किटकनाशके, विषारी रसायने, फुटलेले ट्यूब लाईट, वापरलेले बॅटरी सेल, मुदत संपलेली औषधे इत्यादी. हे सर्व एका पिशवीत घालून ती बांधावी व योग्य रितीने विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिकेच्या कचराकुंडीत टाकावे.
दुषित कचरा		जखमेसाठी वापरलेले बँडेज, जखमेवरचा कापूस, ड्रीप्स, सिरींज, इंजेक्शनसाठी वापरलेल्या सुया इत्यादी. हे सर्व एका पिशवित घालून ती बांधावी व योग्य रितीने विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिकेच्या कचराकुंडीत टाकावे.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED











© TBS NOT TO BE REPUBLISHED

पैंगुळी उडत पुढे गेली.






@KTBS TO BE REPUBLISHED


या प्लास्टीकच्या पिशव्या फेकण्यापेक्षा सामान आणण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी वापरायला हव्या होत्या.
भाजीपाल्याच्या, फळांच्या साली खड्ड्यात घातल्या असत्या तर त्यांचे खत झाले असते.
या डब्याचा काहीतरी चांगला उपयोग करता आला असता.
त्या खताने जमिनीची सुपिकता वाढली असती.
या रिकाम्या बाटल्या विकून पैसे तरी मिळाले असते.
कोरे/रिकामे कागद असतील तर, ते लिहायला वापरावेत. नाहीतर ते कागद, वर्तमानपत्र दुकानदाराला द्यायला हवे होते.



ए भाऊ, तुझी चिंता आता दूर झाली ना?


जाणून घे.



- प्रत्येकानी आपल्याला आवश्यकता आहे तितक्याच वस्तू घ्याव्यात त्यामुळे कचरा कमी होतो.
- एकदा वापरलेली वस्तू पुन्हा वापरावी. यालाच पुर्नवापर म्हणतात.
- कुजणाऱ्या कचऱ्यापासून खत तयार करुन ते झाडांना घालावे.
- प्लास्टीक, काच, कागद यांचा पुन्हा वापर करुन नवीन वस्तू तयार करु शकतो त्यालाच पुनर्निर्मिती म्हणतात.
- वापरलेले पाणी झाडांना/रोपांना घालण्यासाठी वापरावे नाहीतर खड्ड्यात जिरवावे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लोकांनी घरातील कचऱ्याचे काय करावे? लोकांना याची जाणिव कशी द्यावयाची? याची उत्तरे मला मिळाली. आता भूक पण लागली आहे तेव्हां मी बागेत जातो.



या प्रश्नांची उत्तरे लिही.

1. कचरा म्हणजे काय ?

_____

_____

2. तू कचरा म्हणून टाकत असलेल्या पाच वस्तूंची नावे लिही.

_____

_____

3. तुझ्या घरातील कचऱ्याचे काय करशील ?

_____

_____

4. तुझ्या घरासमोर घाण पाणी साचून राहिले तर काय होईल ?

_____

_____

5. मागिल वर्षाची पुस्तके तू काय केलास ?

_____

_____

6. तुमच्या विभागातील/गावातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणाऱ्या खात्याच्या कार्यालयाचा पत्ता मिळवून इथे लिही.

_____

_____

7. कचऱ्याच्या होणाऱ्या उपयोगांची यादी कर.

_____

_____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील विधानापैकी कोणते बरोबर व कोणते चूक ते ओळख. चुकीचे विधान बरोबर करुन लिही.

1. मी कचरा कोठेही टाकतो.

   _____

2. मला लहान होत असलेले माझे कपडे मी दुसऱ्यांना देतो.

   _____

3. मी प्लास्टीकच्या पिशव्या साठवितो आणि मला जेव्हा गरज असते तेव्हां त्यांचा मी वापर करतो.

   _____

4. मोडलेल्या प्लास्टीकच्या वस्तू मी साठवून ठेवतो आणि जुन्या वस्तू विकत घेणाऱ्यांना देतो.

   _____

5. अपायकारक वस्तूंचा कचरा खताच्या खड्ड्यात टाकतो.

   _____

तू घराम मधील कचरा म्हणून टाकत असलेल्या 5 वस्तूंची नावे लिही. तो कोणत्या प्रकारचा कचरा ते लिही. त्याची विल्हेवाट कशी लावणार या बाबत खालील तक्त्यात लिही.

क्र.सं.	**कचऱ्याचे नाव**	**प्रकार**	**तू काय करणार?**
उदाहरण	भाजीच्या साली	ओला कचरा	खत करणार
1.			
2.			
3.			
4.			
5.			

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तू स्वतः कर :

कोणत्या वस्तू कुजतात?

एक रुंद तोंडाची बाटली घे. त्यात अर्धी बाटली होईल इतकी माती भर, त्यात पाने, भाजी, फळांच्या साली, कागदाचे लहान तुकडे, प्लास्टीक, रबर, कापूस आणि लहान बाटल्या घाल. त्यावर पुन्हा थोडी माती घालून त्यावर पाणी शिंपड. दर आठवडयाला बाटलीचे निरीक्षण कर आणि बाटलीतल्या वस्तू हलवून ठेव. तीन ते चार आठवडे त्याचे निरीक्षण कर. चार आठवड्यानंतर बाटलीतील वस्तू बाहेर काढ आणि जुन्या वर्तमानपत्रावर पसर. त्यांचे निरीक्षण कर. कोणत्या वस्तू कुजल्या? कोणत्या वस्तू जलद कुजल्या? कोणत्या वस्तूंचे कुजण्याचे प्रमाण हळू आहे यांची यादी कर.

1. या कृतीतून तू काय शिकलास ?

_____

_____

तू स्वतः कर :

घरातील कचरा तीन दिवस पर्यंत साठव. त्यातील कुजणारे आणि न कुजणारे घटक असे वेगवेगळे कर त्यांच्या आकाराचे निरीक्षण कर.

2. तुझ्या निरीक्षणात आलेले दोन मुद्दे लिही.

_____

_____

3.शाळेत आणि घरात कुजणाऱ्या पदार्थांचा कचरा वेगळा करुन त्याच्यापासून खत तयार कर.

तू स्वतः कर :


तुझ्या मित्रांच्या मदतीने शाळेच्या बागेतील एका कोपऱ्यात 1-2 मीटर लांब व रुंद आणि 1 मीटर खोल खड्डा खण. गवत, पाने, कागदाचे तुकडे त्या खड्डयात घाल. त्यावर थोडे पाणी शिंपड. त्यानंतर त्याच्यावर थोडी माती पसर. दररोज तुझ्या शाळेत जमा होणारा कचरा यात टाकत जा त्यावर पुन्हा पाणी शिंपडून थोडी माती पसर. तो कचरा परतवत रहा. तीन आठवडयात खत तयार होईल. ते खत शाळेसमोरील बागेतील झाडांना घाल. असे खत घराजवळ देखील तयार कर.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. तुमच्या शेजाऱ्यांना कचऱ्याची विल्हेवाट योग्य रितीने कशी करावी याबद्दल माहिती दे. त्याचे भित्ती फलक तयार करुन शाळेत, गावात मुख्य ठिकाणी प्रदर्शित कर.

तू स्वतः कर :

अंड्याच्या कवच्यापासून पेंग्वीन्



एक अंडे घ्या. त्याच्यावरील बाजूला एक छिद्र करुन त्यातील पदार्थ बाहेर काढा. डोळ्यात अथवा कानात घालण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधाची रिकामी बाटली घ्या. त्या बाटलीचे वरील झाकण काढून अंड्याला केलेल्या छिद्रात उलटे बसवा आणि त्यानंतर अंड्याची वरील बाजू खाली करा. त्यामुळे त्या झाकणाच्या आधारावर अंडे उभे राहिल. औषधाच्या बाटलीचे आतले झाकण अंड्याच्या वरच्या बाजूला पेंग्वीनच्या चोचीसारखे बसवा. त्याच्या दोन्ही बाजूला डोळ्यासारखे दोन ठिपके काढा. त्यानंतर कार्डबोर्डचा कागद घेऊन ते पंखासारखे कापून त्याला काळा रंग देऊन त्या अंड्याच्या बाजूला चिकटवा. पेंग्वीन तयार झाला. घरात सजावटीसाठी ठेवा.

तू स्वतः कर :

प्लास्टीकपासून पावसाळी टोपी.

- एक जाड प्लास्टीकची पिशवी घ्या व ती कापा. कापलेल्या प्लास्टीकचा आकार तुझ्या डोक्याच्या आकार इतका असावा.
- ह्या प्लास्टीकला दोन इंच पट्टी येईल असे दुमडा.
- दुमडलेल्या भागाच्या दोन्ही टोकाना जोडून कापडाची पट्टी जोडून शीव. तुझी उन व पावसा-पासून रक्षण करणारी पावसाळी टोपी तयार झाली.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED


याचे प्रमाणे जुने प्लास्टीक अथवा लोखंडाचे डबे सुशोभित करुन पेन ठेवायचा डबा अथवा फुलदाणी तयार करुन घर सुशोभित कर.

हे तुला माहीत आहे का ?

- आपल्या देशात तयार होणाऱ्या घन कचऱ्याच्या शंभर भागापैकी 75-80 भाग खताची निर्मीती करुन वापरु शकतो.
- काच, लोखंड, प्लास्टीकच्या वस्तू वितळवून नविन वस्तू तयार करतात.
- एखाद्या वस्तूच्या आवरणा (पॅकींग)ची किंमत ही त्या वस्तूच्या किंमतीपेक्षा जास्त असते.
- दरवर्षी प्लास्टीकच्या कचऱ्यामुळे समुद्रातील असंख्य प्राणी मरण पावतात.
- सुती कपड्यांना कुजण्यासाठी एक महिना लागतो तर नायलॉनच्या कपड्यांना कुजण्यासाठी 500-600 वर्षे लागतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

या वस्तू कधी कुजतात?



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 12


नकाशा शिका – दिशा जाणा


B1J4U8

या पाठाच्या अध्यायनंतर तू,

- स्थानिक चिन्हांचा उपयोग करुन तु दिशा दर्शवशील.
- नकाशा काढण्याचे मूलभूत कौशल्य शिकशील आणि विविध स्थळे दर्शविण्यास वेगवेगळी चिन्हे वापरुन नकाशा काढण्यास शिकशील.

नकाशा काढण्याबद्दल तुला थोडी माहिती आहे. खाली दिलेला नकाशा बघ. तेथे मध्ये एक मोठे वडाचे झाड आहे. ते ओळख.






© MAHARASHTRA STATE BOARD OF VOCATIONAL EDUCATION PUBLISHED

वडाच्या झाडाच्या स्थानावरुन खाली दिलेल्या स्थळांची दिशा लिही

1. तलाव _____
2. वाचनालय _____
3. शाळा _____
4. पोस्ट ऑफिस _____
5. उद्यान _____
6. मंदीर _____
7. स्वस्त धान्य दुकान _____
8. पशू चिकित्सालय _____
9. मशीद _____
10. चर्च _____
11. इस्पितळ _____
12. विहीर _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील चित्रात तुझे घर दाखविले आहे. दिशांच्या वरुन तुझ्या सभोवती असणाऱ्या स्थळांची नावे लिही.



दिशांच्या संदर्भावरुन तुझ्या घरा सभोवती असणाऱ्या स्थळांची नावे लिही.

पूर्व _____ पश्चिम _____

उत्तर _____ दक्षिण _____

आग्नेय _____ नैऋत्य _____

वायव्य _____ ईशान्य _____

तुझ्या शाळेतील कर्नाटकच्या नकाशाचे निरीक्षण कर. नकाशावरुन राज्याच्या दिशा खालील स्थळासाठी लिही.

अरबी समुद्र _____ आंध्र प्रदेश _____

महाराष्ट्र _____ केरळ _____

4 थ्या इयत्तेतील यास्मीन आपल्या वर्गखोलीचा साधा नकाशा काढण्यास शिकली आहे. तिचे ऐका.

यास्मीन : माझ्या शिक्षकांनी मला माझ्या वर्गखोलीची लांबी व रुंदी माझ्या पावलामध्ये मोजण्यास सांगितले. जेव्हा मी तसे केले तेव्हा वर्गखोलीची लांबी बारा पाऊले व रुंदी दहा पाऊले आढळली. माझी दोन पाऊले म्हणजे एक मीटर लांबी होते असे शिक्षकानी मला सांगितले. परंतू प्रत्येक व्यक्तिगणिक पाऊल वेगवेगळे असते. काही जणांचे एक पाऊल म्हणजे $\frac{3}{4}$ m होईल. तुझ्या पावलाची लांबी ओळख. तुझ्या खोलीची लांबी-रुंदी तुझ्या पावलांनी मोज व नोंद कर. त्यावरुन कागदावर नकाशा कसा काढायचा हे तुला सांगेन.

तू असे समज की तुझ्या खोलीची लांबी 12 पावले व रुंदी 10 पावले आहे.

म्हणून, जर तुझी दोन पावले म्हणजे 1 m लांबी असेल.

तर 12 पावले : 6 m

10 पावले : 5 m

म्हणजेच खोलीची लांबी = 6 m

खोलीची रुंदी = 5 m


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

योग्य प्रमाण घेऊन जर आम्ही 1 m म्हणजे 1 cm असे मानले तर,

6 m = 6 cm


5 m = 5 cm.

हे cm चे मोजमाप कागदावर आखुन घे. हे तुझ्या खोलीचे बाह्यमापन झाले.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता तू वस्तू ओळखू शकतोस, अगदी अचूक स्थान दर्शविण्यास, 1 सें.मी. अंतरावर खाली दिल्या प्रमाणे रेषा आखून घे.



आता, खालील प्रत्येक चौरसाला क्रमांक दे. लांबीला संख्या आणि रुंदीला मुळाक्षरे दे. यामुळे तुला वस्तू सहज ओळखता येतील. नंतर या चौकोनातील वर्गखोलीतील वस्तू त्यांच्या स्थानावरुन ओळख.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नकाशामधील चौरसात असलेल्या वस्तू ओळख :

वस्तू	रुंदी	लांबी
दरवाजा	अ	1
खिडकी		
खूर्ची		
कपाट		
बाक 1.		
2.		
3.		
4.		
5.		
6.		

तुझ्या शाळेतील तुझ्या वर्गखोलीचा किंवा यास्मीनने शिकविल्या प्रमाणे घरच्या मोजमापावरुन तू घराचा नकाशा काढ. नकाशातील खोलीतील वस्तू ओळख.


जाणून घे.


मोठे क्षेत्रफळ असणारी जागा नकाशाने दर्शविता येते. नकाशातील चौरस हे वस्तूंचे अचूक स्थान शोधण्यास उपयोगी असतात.

आता आपण अन्वर तालुका कचेरीला जाण्यास कशी दिशा दाखवितो हे पाहूया.

मुख्य रस्त्याच्या मध्यभागी तेथे गांधी चौक आहे. जर तुम्ही त्याच्या पूर्वेला गेला तर उजवीकडे तेथे एक हॉटेल दिसेल. त्याच्या पलिकडे वसतीगृह, पुढे पोस्ट ऑफिस आणि शाळा. शाळेच्या पुढे तालुका कचेरी आहे. शाळेपासून सुमारे वीस मीटर अंतरावर दूर ती कचेरी आहे. मी हे अंतर माझ्या पावलांनी मोजले आहे.

अन्वरने गांधी चौक ते तालुका कचेरी पर्यंतचा दिशांच्या सहाय्याने एक साधा नकाशा काढला आणि खुणा केल्या.





खुणा:

1. चौक
2. हॉटेल
3. वसतीगृह
4. पोस्ट ऑफिस
5. शाळा
6. तालुका कचेरी
7. माध्यमिक शाळा
8. क्रीडागंण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एका वाक्यात उत्तरे लिही.


1. विस्तिर्ण प्रदेशाचा नकाशा काढण्यास कोणते प्रमाण वापराल.

_____

2. नकाशामध्ये वस्तूंचे अचूक स्थान कसे दर्शवाल.

_____


एका चौरसाकृती खोलीमध्ये, एक टेबल आणि चार खुर्च्या ठेवलेल्या आहेत. खोलीच्या नकाशात त्यांना तू कसे मांडशील.



वस्तू	चौरस	वस्तू	चौरस
	अ 4		
	उ 1		
	उ 4		
	अ 1		

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या घरापासून तुझ्या शाळेपर्यंत जाण्याचा मार्ग दर्शविणारा एक साधा नकाशा काढ. नकाशा काढण्यासाठी खालील चिन्हांचा वापर तू करु शकतोस.



नकाशा काढून झाल्यानंतर, तुझा नकाशा आणि तुझ्या मित्राचा नकाशा यांची अदलाबदल कर. मित्राच्या नकाशावरुन मार्ग (रस्ते), दिशा आणि स्थळांच्या खुणा ओळख. स्थळांच्या खुणा आणि दिशा यांच्या सहाय्याने मार्ग दर्शविणारा नकाशा काढणे शक्य आहे.

खालील नकाशामध्ये, बसचा मार्ग बाणाने दर्शविला आहे. या बसमधून प्रवास करतांना तुला दिसलेल्या स्थानिक खुणांची यादी कर.



तुला हे माहीत आहे का ?

- सर्व नकाशे सेंटिमीटर किंवा इंच या मोजण्याचे एकक घेऊन काढलेले असतात.
- जगाचा नकाशा हा पृथ्वीचा नकाशा असतो.
- नकाशाच्या मदतीने भौगोलिक गोष्टी, रस्ते आणि लोक राहण्याची जागा सहज ओळखता येतात.
- अक्षांश आणि रेखांश या काल्पनिक रेषा नकाशावर चौकोन होण्यास मदत करतात.
- नकाशे विविध प्रकारचे असतात. उदाहरणार्थ : भौगोलिक नकाशा, माती नकाशा, हवामान नकाशा, रेल्वेमार्ग नकाशा इत्यादि.
- इजिप्तच्या राजाने आपल्या साम्राजाचा विस्तार समजण्यासाठी नकाशा तयार केला होता आणि ग्रिकांनी इ.स. पूर्व 540 मध्ये जगाचा नकाशा काढला होता असे मानले जाते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED